अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । बुधवार
०७.१०.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २४८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# पोलीसांनी केला पुण्यातील ऑनलाईन गेमिंग आर्थिक जाळ्याचा पर्दाफाश

## मुख्य आरोपी वरुड तालुक्यातील : प्राथमिक तपासात सुमारे ३ कोटींची सायबर फसवणुक निष्पन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – पुण्यातील ऑनलाईन गेमिंग आर्थिक जाळ्यासंदर्भात पोलिसांनी वरुड तालुक्यातील ३ मुख्य आरोपींना अटक केल्याने तालुक्यात खळबळ माजली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांच्या बँक खात्यांचा गैरवापर करून ऑनलाईन गेमिंग व इतर आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल केली जात असल्याची बाब निर्दशनास आल्याने जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन कवच अंर्तगत जिल्हयात मोठया प्रमाणात सायबर जनजागृती मोहीम राबविल्या जात आहे. सायबर गुन्ह्यांच्या तपासावर सुध्दा विशेष भर देण्यात येत आहे, अशातच पोलीस स्टेशन शिरजगाव, अमरावती ग्रामीण येथे अपराध क्रमांक ३०८/२०२६, कलम ३१६(२), ३१८(४), ३१९, ३(५) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये दाखल सायबर गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस स्टेशन, अमरावती ग्रामीण यांचेकडे सोपविण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान करण्यात आलेल्या तांत्रिक माहितीचे सखोल विश्लेषण तसेच आर्थिक व्यवहारांची पडताळणी याव्दारे सदर गुन्हयातील आरोपीतांची पुढील साखळी ही पुणे येथे असल्याबाबत निष्पन्न झाल्याने सायबर पोलीस स्टेशन, अमरावती ग्रामीणच्या पथकाने पुणे येथे जाऊन आरोपींचा शोध घेतला असता पुणे, धायरी येथील अर्णव हाईट्स, यमुना ताई पोखळे नगर, येथील अपार्टमेन्टमध्ये धाडक टाकून ४.४० लाख



किमतीचा मुद्देमालासह ३ आरोपींना अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये भूषण सुभाष दंडाळे (२३) रा.कुरळी, पो.सुरळी, रोशननंद राजु दंडाळे, (२८), रा.वॉर्ड नं.१, सावंगा, ता.वरुड, ३) अंकित विठ्ठलराव मसुळे, (२६), रा.वॉर्ड नं.१, जरुड, ता.वरुड आज पावेतो सदर गुन्ह्यात एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर कार्यवाही दरम्यान मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक व बँकिंग साहित्य जप्त करण्यात आले त्यामध्ये आरोपींकडून २४ मोबाईल हँडसेट, ४ लॅपटॉप, २९ विविध बँकांचे एटीएम कार्ड, १३ चेकबुक, ७ विविध बँकांची पासबुक, १२ विविध कंपन्यांचे एसआयएम कार्ड, असा एकूण अंदाजे ४.४० लाख किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेल्या मोबाईल हँडसेट व लॅपटॉपच्या प्राथमिक तपासणीत ऑनलाइन गेमिंग, बेटिंगशी संबंधित व्यवहार व त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या डिजिटल माध्यमांचा वापर झाल्याचे तपासात पुढे आले असून, त्याबाबत अधिक सखोल तांत्रिक तपास सुरू आहे.

सदर गुन्ह्याच्या आर्थिक तपासादरम्यान उपलब्ध बँक व्यवहारांचे प्राथमिक विश्लेषण केले असता आतापर्यंत सुमारे ३ कोटी रुपयांची सायबर फसवणुक निष्पन्न झाला. सदर आर्थिक व्यवहारांची सखोल पडताळणी करण्यात येत असून संबंधित बँक खाती, व्यवहारातील लाभार्थी, अंतिम लाभार्थी तसेच आर्थिक व्यवहारांच्या साखळीशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. जप्त मोबाईल हँडसेट व लॅपटॉपचे डिजिट, फॉरेन्सिक विश्लेषण सुरु असून, त्यामधून ऑनलाइन गेमिंग, बेटिंगशी संबंधित आर्थिक व्यवहार, संपर्कातील व्यक्ती, व्यवहारांची साखळी तसेच गुन्ह्यात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींबाबत माहिती संकलित करण्यात येत आहे. संपूर्ण तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढून पुणे येथे करण्यात आलेली कारवाई ही सदर तपासातील महत्त्वपूर्ण बाब ठरली असून, प्राथमिक आर्थिक तपासातून गुन्ह्याची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढील तपासादरम्यान आणखी आर्थिक व्यवहार, लाभार्थी व सहभागी आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनाखाली अपर पो-लीस अधिक्षक दत्ता तोटेवाड व सायबर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात सपोनी अमोल पुरी, श्रेणी पोउपनी सुनिल बन्सोड, पोहवा प्रवीण वानखडे, पंकज गोलाईतकर, प्रवीण अंबाडकर, गुणवंत शिरसाठ, विकास अंजिकर आणि रितेश गोसावी, राहुल गौरखेडे, आशिष जांभुळे, सुमित चव्हाण, पुनम कान्होलीकर, कल्पणा सोनोत्रे, सरिता चौधरी व चालक ईमरान सायबर पोलीस स्टेशन, अमरावती ग्रामीणच्या पथकाने केली असून, पुढील तपास सुरू आहे.

### सर्वसामान्य नागरिकांना आवाहन

“नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी पडू नये आपले बँक खाते, एटीएम कार्ड, पासबुक, मोबाईल क्रमांक, सिम कार्ड, आधार लिंक मोबाईल क्रमांक किंवा इतर बँकिंग साधने कोणत्याही व्यक्तीस वापरण्यास देऊ नयेत. अशा खात्यांचा वापर सायबर फसवणूक, ऑनलाइन गेमिंग, बेटिंग किंवा इतर बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांसाठी होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या आमिषांपासुन सावध राह-वे, अशाप्रकारे कोणतीही बाब निर्दशनास आल्यास त्वरीत राष्ट्रीय सायबर हेल्प लाईन क्रंमाक १९३० व अमरावती ग्रामिण सायबर हेल्पलाईन क्रंमाक ७०३०० ०६८५९ यावर माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी केले आहे.

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली ‘विकसित भारत’चा संकल्प पूर्ण करु मुख्यमंत्री फडणवीस यांचा विश्वास!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून २००१ मध्ये सुरू झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय सेवेला बुधवारी २५ वर्षे पूर्ण झाली.



मुख्यमंत्री ते पंतप्रधान असा मोदींचा २५ वर्षांचा सेवाप्रवास पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र भाजपच्या वतीने बुधवारी ‘सेवा संकल्प अभियानां’तर्गत ‘विकसित भारत ऽ२०४७’ संकल्प सभा आणि ‘सेवा ज्योती यात्रा’चा प्रारंभ करण्यात आला. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोदी यांच्या २५ वर्षांच्या सेवापर्वाचे कौतुक करत २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# देशात ‘गडचिरोली’ ठरला ‘अव्वल’ : निती आयोगाच्या तिमाही डेल्टा रँकिंगमध्ये पटकावला पहिला क्रमांक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***गडचिरोली*** – गडचिरोलीसह महाराष्ट्रासाठी एका मोठी आंनददायी बातमी समोर आली आहे. निती आयोगाच्या तिमाही डेल्टा रँकिंगमध्ये देशात गडचिरोलीने पहिला क्रमांक पटकावला आहे. संपूर्ण देशभरात आकांक्षित जिल्ह्यांसाठी जो कार्यक्रम राबविला जातो, त्यात जीवनमानात लक्षणीय बदल घडविण्यासाठी प्रत्येक तिमाहीसाठी हे रँक दिले जातात. या तिमाहीत गडचिरोली जिल्हा संपूर्ण देशात




प्रथम आला आहे. तर जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला हा जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. एप्रिल ते जून २०२६ असा हा कालखंड आहे. तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबाबत गडचिरोलीकरांचे आभार मानत शुभेच्छा दिल्या आहेत. आकांक्षित जिल्ह्यांतील जीवनमानात लक्षणीय बदल घडविल्याने हा रँक देण्यात आल्याचे बोललं जात आहे. तर शेती आणि जलसंधारण क्षेत्रात ही गडचिरोलीने बाजी मारल्याची माहिती आहे. नीती आयोगाच्या तिमाही डेल्टा रँकिंगमध्ये आपल्या गडचिरोलीने संपूर्ण देशात पहिला क्रमांक पटकावल्या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी ते म्हणाले की, संपूर्ण देशभरात आकांक्षित जिल्ह्यांसाठी जो कार्यक्रम राबविला जातो, त्यात जीवनमानात लक्षणीय बदल घडविण्यासाठी प्रत्येक तिमाहीसाठी हे रँक दिले जातात.

## दुष्काळ परिस्थितीचा आ.यावलकर यांनी घेतला आढावा

# तातडीने उपाययोजना करण्याचे दिले निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करण्यासाठी विविध विभागातील संबंधित अधिकारी यांची सोमवार ५ ऑक्टोबर रोजी आमदार कार्यालयात आ.उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त आढावा बैठक पार पडली.




यावेळी भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष श्रीधर सोलव, तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत, माजी जिल्हापरिषद सदस्य गोपाल मालपे, निळकंठ मुरूमकर, समिर ठाकरे उपस्थित होते. या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश आमदार यावलकर यांनी दिले.

जलसंपदा, जल व मृदासंधारण, लघु पाटबंधारे व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे, कृषी व पशुसंवर्धन विभागाचे, महावितरण विभागाचे अधिकाऱ्यांनी या आढावा बैठकीत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत उपस्थित शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या समस्यांचे निवारण करण्यात आले. सकाळच्या सत्रात प्रथम जलसंपदा, जल व मृदासंधारण, लघु पाटबंधारे व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची संयुक्त बैठक पार पडली तर दुसऱ्या टप्प्यात कृषी व पशुसंवर्धन विभागाची तर तिसऱ्या टप्प्यात महावितरण विभागाची बैठक पार पडली. या आढावा बैठकीमध्ये पाणी, शेती, पशुधन, वीज, मनोरेगा व दुष्काळाशी संबंधित समस्या जाणून घेण्यात आल्या तसेच भविष्यात अशाप्रकारे परिस्थिती उदभवु नये याकरिता योग्य कार्यपद्धतीचा वापर करून संबंधित अधिकाऱ्यानी आपले कार्य पार पाडणे काळाची गरज आहे. निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचा सामना कशा पद्धतीने करता येईल याबाबत आ.यावलकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहे.

# शहरातील टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वार ठार : चौधरी पेट्रोल पंप समोरील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – बसस्थानक जवळील न्यू इंग्लिश हायस्कूल समोर असणाऱ्या चौधरी पेट्रोल पंप समोर टिप्पर व दुचाकीचा मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडे अकरा ते बाराच्या सुमारास भिषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालकाचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. संजय प्रकाशराव घोरपडे (२८) रा. शेंदुरजनाघाट असे मृतकाचे नाव असून दिनेश पारनोजी नागले असे टिप्पर चालकाचे नाव आहे.



प्राप्त माहितीनुसार, शेंदुरजनाघाट येथील मलकापूर परिसरातील जुना मालखेड रस्त्यावरील वास्तव्यास असलेले प्रकाश घोरपडे व त्यांची पत्नी मिना घोरपडे मौलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. त्यांचा एकुलता एक मुलगा संजय हा खासगी वाहनावर



संजय प्रकाशराव घोरपडे

चालक म्हणून कार्यरत होता. संजय सकाळी ११ वाजताच्या सुमारास त्याच्या जवळील प्लॉटीना दुचाकी क्रमांक एम. एच. २७ पी आर ३०९२ घेऊन वरूड आला. दुचाकीमध्ये चौधरी पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून रस्ता ओलांडत असताना बसस्थानकाकडुन पांढुर्णा चौकाकडे जाणाऱ्या भरधाव टिप्पर क्रमांक एम. एच. २७ बी एक्स ९७६८ ने संजयच्या दुचाकीला जबर धडक दिली. या धडकेत संजय रस्त्याच्या कडेला असलेल्या ग्रिलींग जवळ फेकला गेला. त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने घटनास्थळी मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झालाने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. उपस्थित नागरिकांच्या मदतीने त्याला तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच सपोनि श्रीकांत विखे घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करण्यात आला. पोलिसांनी अपघातग्रस्त दुचाकी, टिप्पर ठाण्यात जमा केले आहे.

चालकाला ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे. याप्रकरणी मृतकाचा चुलत भाऊ सुधीर बाबाराव घोरपडे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. संजय घोरपडे यांच्या आकस्मिक मृत्यूने घोरपडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मलकापूर परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे. त्याच्या पश्चात आई, वडिल व दोन विवाहित बहिणी असल्याचे कळते.

## न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये

# महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी



■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका कोमल पांडव यांचे हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर तसेच त्यांच्या सत्य, अहिंसा आणि देशप्रेमाच्या विचारांवर आधारित भाषणे सादर केली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे नर्सरी ते के.जी.तसेच इयत्ता पहिलीपासून पुढील वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रपुरुष व स्वातंत्र्यसैनिकांची वेशभूषा धारण करून सहभाग घेतला. मुख्याध्यापिका कोमल पांडव यांनी विद्यार्थ्यांना गांधी जयंतीचे महत्त्व तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणाचा, प्रामाणिकपणाचा आणि राष्ट्रसेवेचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर मांडला. विद्यार्थ्यांच्या सुंदर वेशभूषा, उत्स्फूर्त भाषणे आणि प्रभावी सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, सत्य, अहिंसा, त्याग, शिस्त आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळाली. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# 'मी कोणत्याही महत्त्वाकांक्षेसाठी नाही तर ध्येयासाठी जगतो': सरकार प्रमुख म्हणुन २५ वर्षे पूर्ण झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी भावुक!

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – आपल्या आयुष्यात कधीही निवडणूक लढवण्याचा विचार केला नव्हता, कारण लहानपणापासून मिळालेले संस्कार आणि शिक्षण यांनी आपल्याला 'महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर ध्येयासाठी जगणारी व्यक्ती' बनवले आहे, असे भावूक उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.



सरकारप्रमुख म्हणून २५ वर्षांचा प्रदीर्घ कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प सभे'त ते बोलत होते. आपल्यासाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून देशसेवा आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'आजचा दिवस हा केवळ जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा नाही, तर आपल्या संकल्पांमध्ये नवी ऊर्जा भरण्याचा दिवस आहे. भारताला नव्या उंचीवर नेण्यासाठी जनतेचा उत्साह आणि 'सबका प्रयास' अत्यंत गरजेचे आहेत.' यावेळी त्यांनी उपस्थितांकडून 'आम्ही हे करून दाखवू!' या संकल्पाचा पुनरुच्चार करून घेतला.

२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवणे, जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणे, आत्मनिर्भर भारत घडवणे, जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनणे, ऑलिंपिकचे आयोजन करणे आणि अंतराळ क्षेत्रात नवी झेप घेणे, हे सर्व संकल्प देश नक्कीच पूर्ण करेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# चंद्रशेखर बावनकुळेंना बंडोपंत उमरकर स्मृती पुरस्कार

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नरखेड** – ग्रामीण विकास आणि सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल महाराष्ट्राचे महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना 'स्व, बंडोपंत उमरकर स्मृती सामाजिक कार्य पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. शनिवार (ता.१०) सकाळी १०.१५ वाजता शंकरनगर चौक येथील श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.



स्व. बंडोपंत उमरकर यांच्या निधनानंतर त्यांची सामाजिक वग्रामविकासाच्या कार्याची प्रेरणा कायम राहावी, तसेच ग्रामीण भागाच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव व्हावा, या उद्देशाने प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये रोख,शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे प्रमुख सल्लागार डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते बावनकुळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ नेते आणि माजी प्राचार्य डॉ.बबनराव तायवाडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त ॲड.मुकेश शर्मा विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शांतीनिकेतन इंग्रजी शाळेत पाठ सुंदर जीवनाचा कार्यक्रम उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शांतिनिकेतन इंग्रजी शाळा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणारा 'पाठ सुंदर जीवनाचा' हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.



विद्यार्थ्यांना सुंदर निरोगी शिस्तबद्ध व संस्कार क्षण जीवन जगण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.किशोरी अकर्ते होत्या तर प्रमुख अतिथी म्हणुन सरिता सावरकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.बाबाराव ठाकरे यांनी केले. गौरी धनोरकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना कायदा व सुव्यवस्था याबाबत मार्गदर्शन केले. आयोजक ठाकरे यांनी उत्तम आरोग्यासाठी आवश्यक सवयी व आरोग्यदायी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी सदिच्छा सावरकर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा दखल देत विद्यार्थ्यांनी जीवन जगताना चांगले आचरण माणुसकी प्रेम प्रामाणिकपणा व शिस्त यांचा अंगीकरण करावा असे सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक विनोद ठवळी व उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना जीवन सुंदर बनवण्यासाठी चांगले विचार व चांगले गुण अंगी करण्याचा संदेश दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी जीवनाला सकारात्मक दिशा देणारा ठरला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त उपस्थितीत आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नाने शांततेत पार पडला. कार्यक्रमाचे संचालन तन्वी अस्सलकर हिने तर आभार प्राजक्ता राऊत हिने आभार मानले.

## माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात

# महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीचे आयोजन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**लोणी** – अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय लोणी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधीं व माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छ्ता ही सेवा' या संकल्पनेखालील विशेष स्वच्छ्ता मोहीमचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक आर.एच.जवंजाळ, मुख्याध्यापिका एस.एम.दुर्योधन, वरिष्ठ लिपीक एन.एस.वडनेरकर, आर.डी.सोळंके, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन हारार्पण दीपप्रज्वलन करून प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

यावेळी अनेक विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी महापुरुषांच्या जीवनपटावर आपले विचार मांडले. यानंतर एस.एम.दुर्योधन व आर.एच.जवंजाळ यांनी गांधीजी व शास्त्रीजी मनोगत व्यक्त करुन कार्यक्रमानिमित विद्यार्थ्यांचे कौतुक करून सदिच्छा दिल्या.

संचालन वांशिका पापडकर, प्रास्तविक श्रुतिका चापले तर उपस्थितांचे आभार नाजिया शहा हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदींनी सहकार्य केले.

# पुणे विधानपरिषद निवडणुकीत महायुतीत बंडखोरीचा उद्रेक

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## भाजप उमेदवारांविरोधात शिवसेना व राष्ट्रवादी मैदानात

***पुणे*** – पुणे विभागीय विधानपरिषद निवडणुकांमध्ये महायुतीतील अंतर्गत मतभेद उघडपणे चव्हाट्यावर आले असून शिक्षक आणि पदवीधर दोन्ही मतदारसंघांत मित्रपक्षांनी थेट बंडखोरी केल्याने मोठा राजकीय ट्विस्ट निर्माण झाला आहे.

विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी जाहीर केलेली असताना, शिवसेनेचे (शिंदे गट) मंगेश चिवटे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत आपला स्वतंत्र उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे, पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या अधिकृत उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांचे निकटवर्तीय भैय्या



माने यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरल्यामुळे दोन्ही मतदारसंघांत महायुतीतील घटकांनी भाजपला थेट खिंडीत गाठल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघाची जागा महायुतीत भाजपकडे गेली असून, टीडीएफ संघटनेची अधिकृत उमेदवारी मिळालेल्या कौस्तुभ गावडे यांना भाजपने रिंगणात उतरवले आहे. मात्र, या निर्णयाला न जुमानता शिवसेनेचे मंगेश चिवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या थेट आदेशानुसारच आपण निवडणूक रिंगणात उतरत असल्याचे चिवटे यांनी जाहीर केले आहे. महायुतीच्या दोन्ही प्रमुख घटक पक्षांनी (शिवसेना व राष्ट्रवादी) स्वतंत्र उमेदवार मैदानात उतरवल्यामुळे मतविभाजनाचा मोठा फटका भाजपला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# प्रा.किरण पवार यांचे निधन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक किरण वसंतराव पवार यांचे आज सायंकाळच्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. आज सायंकाळच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने शहरातील डॉ.कुबडे रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु तत्पुर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची वार्ता शहरात पसरताच अनेकांनी त्यांच्या सराफा लाईन परिसरातील निवासस्थानी जावुन



अंत्यदर्शन घेतले. त्यांच्यावर पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता न.प.मोक्षधाम डवरगाव रोड वरुड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

त्यांच्या मागे पत्नी, भाऊ संजय, मिनल व लक्ष्मी अशा २ मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने शहरात शोक व्यक्त केल्या जात आहे.

# बस सेवा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

## आमदार उमेश यावलकर यांच्या प्रयत्नांना यश : आलोडा, बेलोरा व परसोडासाठी स्वतंत्र बसफेरी सुरु

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**लोणी** – लोणी परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी वरुड आगार व्यवस्थापकांनी आलोडा, बेलोरा आणि परसोडा या गावांसाठी स्वतंत्र बसफेरी सुरू केल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. आमदार उमेश यावलकर यांच्या प्रयत्नातून ही बससेवा सुरू करण्यात आली.



लोणी येथील श्रीमती राम्प्यारीबाई चांडक विद्यालयासह परिसरातील विविध शाळांमध्ये आलोडा, बेलोरा, परसोडा व इतर गावांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थी ये-जा करतात. ही गावे शाळेपासून दोन ते पाच किलोमीटर अंतरावर आहेत. वरुडला जाणाऱ्या नियमित बसफेऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेच्या वेळेला सोयीच्या नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. तसेच शाळा सुटल्यानंतर घरी पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागत होती. ही अडचण लक्षात घेऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. व्ही. खोडे यांनी गावातील सरपंच व उपसरपंचांच्या माध्यमातून वरुड आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांच्याकडे निवेदन दिले. तसेच आमदार उमेश यावलकर यांच्याकडेही लेखी निवेदन देऊन बसफेरी सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आमदारांच्या सूचनेनंतर आगार व्यवस्थापनाने तिन्ही गावांसाठी स्वतंत्र बसफेरी सुरू केली.

बस लोणी येथे दाखल होताच विद्यार्थ्यांनी उत्साहाने बसमध्ये प्रवेश केला. वेळेवर घरी पोहोचता येणार असल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गावातील प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक वासुदेव पोहरकर व प्रकाश मालपे यांच्या हस्ते बसचालक संतोष गवई व वाहक देवेंद्र गजभिये यांचा नारळ, पान व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या बससेवेसाठी आमदार उमेश यावलकर, आगार व्यवस्थापक आकाश तागडे, आगार निरीक्षक वाढबुधे, दर्शन गावंडे महाराज, वासुदेव पोहरकर, सर्व गावांचे सरपंच-उपसरपंच व सदस्य तसेच श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयातील शिक्षकवृंदांचे विद्यार्थी व पालकांनी आभार मानले.

# संपादकीय

**ध्येय निश्चित करा आणि ते पूर्ण करण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करा.**

## आदिवाणी : आदिवासींच्या आवाजाला मिळणारे व्यासपीठ

भारतीय लोकशाहीचे खरे सौंदर्य विविधतेत आहे. भाषा, संस्कृती, परंपरा, बोली, जीवनपद्धती आणि सामाजिक अनुभव यांच्या असंख्य प्रवाहांनी भारतीय समाज समृद्ध झाला आहे. मात्र या विविधतेत काही समाजांचे आवाज आजही मुख्य प्रवाहापर्यंत अपेक्षित ताकदीने पोहोचत नाहीत. आदिवासी समाज हा त्यापैकी एक महत्त्वाचा घटक आहे. शतकानुशतके जंगल, जमीन, जलस्रोत आणि निसर्गाशी नाते जोडून जगणाऱ्या या समाजाकडे स्वतःची समृद्ध संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि जीवनदृष्टी आहे. मात्र त्यांच्या प्रश्नांवर बोलणारे अनेक असले तरी त्यांच्या स्वतःच्या आवाजात त्यांचे म्हणणे ऐकण्याची संधी तुलनेने कमी मिळते. याच पार्श्वभूमीवर 'आदिवाणी'सारख्या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित होते. 'आदिवाणी' केवळ एक व्यासपीठ नाही, तर आदिवासी समुदायांना स्वतःच्या अनुभवातून, स्वतःच्या भाषेत आणि स्वतःच्या अटींवर आपली भूमिका मांडण्याची संधी देणारी संकल्पना आहे. कोणीतरी दुसऱ्याने आदिवासींच्या समस्या सांगण्यापेक्षा संबंधित समाजातील व्यक्तीने स्वतःचा अनुभव मांडणे अधिक परिणामकारक असते. कारण त्या अनुभवामध्ये केवळ माहिती नसते, तर जगलेले वास्तव असते. आदिवासी समाजाकडे पाहण्याची मुख्य प्रवाहातील दृष्टी अनेकदा एकांगी राहिली आहे. आदिवासी म्हणजे जंगलात राहणारा समाज, अशी मर्यादित प्रतिमा निर्माण करण्यापलीकडे त्यांच्या ज्ञानाची, कलेची, परंपरेची आणि सामाजिक योगदानाची पुरेशी चर्चा झालेली नाही. त्यांच्या सण-उत्सवांपासून लोककलेपर्यंत, पारंपरिक औषधोपचाराच्या ज्ञानापासून पर्यावरण संवर्धनाच्या पद्धतींपर्यंत अनेक गोष्टी भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र या वारशाचे दस्तऐवजीकरण आणि सादरीकरण अनेकदा बाहेरील नजरेतून झाले. आता ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. आदिवासींच्या प्रश्नांकडे केवळ सहानुभूतीच्या दृष्टीने पाहणे पुरेसे नाही. त्यांना अधिकार, समान संधी आणि स्वतःची भूमिका मांडण्याचा अधिकार मिळणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, वनहक्क, जमीन, विस्थापन, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक जतन या प्रश्नांवर चर्चा करताना आदिवासींचा थेट सहभाग असला पाहिजे. त्यांच्या भवितव्याबाबत निर्णय घेताना त्यांचा आवाज केंद्रस्थानी असणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. 'आदिवाणी'चे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते.




# ७.१ टक्के विकासदर : भारतीय अर्थव्यवस्थेची कसोटीही तितकीच मोठी

**भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत जागतिक पातळीवरून आलेली ताजी आकडेवारी निश्चितच लक्षवेधी आहे. जागतिक बँकेने आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज ७.१ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. मजबूत देशांतर्गत मागणी आणि निर्यातीतील सकारात्मक कामगिरी यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.**

ही आकडेवारी केवळ अर्थतज्ज्ञांच्या चर्चेपुरती मर्यादित नाही. जीडीपी वाढ म्हणजे देशात वस्तू व सेवांचे उत्पादन, आर्थिक व्यवहार, गुंतवणूक आणि उपभोग यांची एकत्रित स्थिती दर्शवणारा महत्त्वाचा निर्देशक. त्यामुळे विकासदर वाढण्याचा अंदाज हा अर्थव्यवस्थेतील काही मूलभूत घटकांमध्ये सकारात्मक हालचाल असल्याचे संकेत देतो. जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारताची देशांतर्गत मागणी मजबूत राहिली असून, निर्यातीनेही वाढीला आधार दिला आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत सेवा क्षेत्राची भूमिका सातत्याने महत्त्वाची राहिली आहे. त्यासोबत उत्पादन, पायाभूत सुविधा आणि बांधकाम क्षेत्रातील हालचालीही अर्थव्यवस्थेला चालना देतात. जागतिक बँकेच्या ताज्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताची वास्तविक जीडीपी वाढ ७.८ टक्के झाली आणि २०२७ च्या पहिल्या तिमाहीतही ७.८ टक्के वाढ नोंदवली गेली.

मात्र विकासदराची आकडेवारी उत्साह निर्माण करणारी असली तरी त्याकडे वास्तवाच्या कसोटीवर पाहणे आवश्यक आहे. देशाची अर्थव्यवस्था ७.१ टक्क्यांनी वाढत असताना या वाढीचा लाभ सामान्य नागरिकांच्या जीवनमानात किती प्रमाणात दिसतो, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. रोजगाराच्या संधी वाढत आहेत का, ग्रामीण भागातील उत्पन्न सुधारत आहे का, शेतकऱ्यांच्या हातात अधिक पैसा पोहोचत आहे का आणि लघु-मध्यम उद्योगांना पुरेशी चालना मिळत आहे का, यांची उत्तरेही विकासाच्या चर्चेत महत्त्वाची आहेत.

आर्थिक विकासाचा खरा अर्थ केवळ मोठ्या उद्योगांची उलाढाल किंवा शेअर बाजारातील तेजी एवढाच नसतो. देशातील सामान्य कुटुंबाची क्रयशक्ती वाढणे, तरुणांना रोजगार मिळणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर होणे, छोट्या



व्यावसायिकांना बाजारपेठ मिळणे आणि शिक्षण-आरोग्याच्या सुविधा सुधारणे, यामधून विकासाचे व्यापक चित्र स्पष्ट होते.

भारतासमोर काही मोठी आव्हानेही कायम आहेत. जागतिक बँकेने वाढत्या तेलाच्या किमती, संभाव्य एल निनोचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम आणि जागतिक बाजारातील अस्थिरता यांना अर्थव्यवस्थेसाठी जोखमीचे घटक मानले आहे. भारत ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याने कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यास महागाई आणि आयात खर्चावर परिणाम होऊ शकतो.

कृषी क्षेत्रासाठी हवामानाचा प्रश्न अधिक गंभीर आहे. पावसातील अनिश्चितता, तापमानातील बदल आणि एल निनोचा संभाव्य प्रभाव यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असते. कृषी उत्पादन कमी झाले तर केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्नच प्रभावित होत नाही, तर अन्नधान्याच्या किमती आणि ग्रामीण मागणीवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आर्थिक विकासाच्या वेगाबरोबर हवामान बदलाच्या आव्हानांवरही धोरणात्मक लक्ष देणे आवश्यक आहे.

याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय हे भविष्यातील आर्थिक वाढीचे महत्त्वाचे साधन ठरू शकते. जागतिक बँकेने भारताच्या मोठ्या तांत्रिक मनुष्यबळाचा, डिजिटल पायाभूत सुविधांचा आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राच्या अनुभवाचा उल्लेख करत एआयच्या माध्यमातून उत्पादकता आणि सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा करण्याची क्षमता अधोरेखित केली आहे. मात्र त्यासाठी कौशल्यविकास, डिजिटल पायाभूत सुविधा आणि व्यापक प्रशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेने जागतिक अनिश्चिततेच्या काळातही वाढीची क्षमता दाखवली आहे, ही सकारात्मक बाब आहे. परंतु पुढील टप्पा अधिक कठीण आहे. वाढीचा वेग कायम ठेवण्याबरोबरच त्या वाढीचे फायदे समाजातील विविध स्तरांपर्यंत पोहोचवणे ही खरी कसोटी असेल.

७.१ टक्के विकासदर हा निश्चितच महत्त्वाचा आर्थिक संकेत आहे; पण तो अंतिम यशाचा दाखला नाही. आर्थिक वाढीचे रूपांतर रोजगार, उत्पन्न, गुंतवणूक, उत्पादन आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानातील सुधारणेत झाले तरच या आकडेवारीला व्यापक अर्थ प्राप्त होईल.

भारताची अर्थव्यवस्था मोठी होत आहे, हे महत्त्वाचे; परंतु भारताच्या प्रत्येक नागरिकाची आर्थिक सुरक्षितता आणि संधी वाढत आहे का, हा प्रश्न त्याहून महत्त्वाचा आहे. विकासदराच्या आकड्यांपासून विकासाच्या प्रत्यक्ष अनुभवापर्यंतचा हा प्रवासच भारताच्या आर्थिक भवितव्याची खरी दिशा ठरवणार आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : ग्रामविकासाचा महामंत्र देणारे युगपुरुष

**ग्रामोन्नती, सामाजिक समता, राष्ट्रभक्ती आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंतांच्या विचारांची आजही तितकीच गरज**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ संत नव्हते, तर समाजजागृतीचे प्रभावी माध्यम, ग्रामविकासाचे द्रष्टे विचारवंत आणि राष्ट्रनिर्माणासाठी आयुष्य समर्पित करणारे युगपुरुष होते. भजन, कीर्तन आणि खंजिरीच्या माध्यमातून त्यांनी सामान्य माणसाच्या मनाला स्पर्श केला. धर्माच्या नावाखाली निर्माण होणारे अंधश्रद्धेचे जाळे, जातिभेद, सामाजिक विषमता आणि व्यसनाधीनता यांच्यावर त्यांनी कठोर प्रहार केला. त्याच वेळी स्वच्छता, शिक्षण, ग्रामविकास, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू माणूस आणि त्याचा सर्वांगीण विकास हा होता.

तुकडोजी महाराजांचे मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर. अमरावती जिल्ह्यातील यावली येथे २९ एप्रिल १९०९ रोजी त्यांचा जन्म झाला. औपचारिक शिक्षण फारसे झाले नसले तरी आत्मज्ञान, समाजजीवनाचे निरीक्षण आणि लोकांशी असलेला त्यांचा जिव्हाळा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण घडले. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू. त्यांच्या मार्गदर्शनातून तुकडोजी महाराजांनी अध्यात्मासोबतच समाजसेवेचा मार्ग स्वीकारला.

त्यांच्या कार्याची खरी ताकद होती ती लोकांच्या भाषेत लोकांशी संवाद साधण्याची. अवघड तत्त्वज्ञान सामान्य माणसाला समजेल अशा साध्या भजनातून आणि कीर्तनातून त्यांनी मांडले. खंजिरी हातात घेऊन गावोगावी फिरणाऱ्या या संताने केवळ भक्तीचा संदेश दिला नाही, तर माणसाला स्वतःच्या जीवनाकडे विवेकाने पाहण्याची दृष्टी दिली. देवभक्ती म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर माणसाची सेवा आणि समाजाचे कल्याण हीच खरी भक्ती असल्याचा संदेश त्यांनी दिला.

**ग्रामविकास हाच राष्ट्रविकास**

तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वात गावाला विशेष महत्त्व होते. भारत हा खेड्यांचा देश असल्याने खेडी सक्षम झाली तरच राष्ट्र सक्षम होईल, अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांनी ग्रामस्वच्छता, शिक्षण, ग्रामोद्योग, स्वावलंबन, सामूहिक श्रम आणि सामाजिक एकजुटीवर भर दिला. अमरावती जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार ग्रामोन्नती आणि ग्रामकल्याण हे त्यांच्या विचारसरणीचे केंद्रबिंदू होते.

आज ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जात असताना तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. केवळ सरकारी निधी मिळाला म्हणजे गावाचा विकास होत नाही. गावकऱ्यांचा सहभाग, श्रमदान, स्वच्छतेची सवय, शिक्षणाची आवड आणि सामूहिक निर्णयक्षमता यांची जोड विकासाला आवश्यक असते. हीच भूमिका तुकडोजी महाराजांनी अनेक दशकांपूर्वी मांडली होती.

**ग्रामगीता : ग्रामीण जीवनाचा विचारग्रंथ**

तुकडोजी महाराजांच्या साहित्याचा विचार केला तर *ग्रामगीता* हा त्यांचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ ठरतो. ग्रामजीवनातील प्रश्न, सामाजिक दोष, आर्थिक



स्वावलंबन, शिक्षण, नैतिकता, नेतृत्व, स्वच्छता आणि ग्रामसंघटन यांसारख्या विषयांचा त्यांनी या ग्रंथातून विचार केला.

आज गावांमध्ये रस्ते, पाणी, वीज, इंटरनेट आणि आधुनिक सुविधा पोहोचत असल्या तरी ग्रामविकासाचा खरा अर्थ केवळ भौतिक सुविधा नाही. गावातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता आले पाहिजे, तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे, महिलांना समान संधी मिळाली पाहिजे, शेतकरी सक्षम झाला पाहिजे आणि गावातील सामाजिक सलोखा टिकला पाहिजे. हा व्यापक ग्रामविकासाचा विचार तुकडोजी महाराजांच्या कार्यातून दिसतो.

**सामाजिक समतेचा आग्रह**

जातिभेद आणि सामाजिक विषमता यांना तुकडोजी महाराजांनी विरोध केला. सर्व माणसे समान आहेत, समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, ही भावना त्यांच्या कार्यात होती. सर्वधर्मसमभाव आणि सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून त्यांनी समाजातील भेद दूर करण्याचा प्रयत्न केला.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपण पुढे जात असलो तरी समाजात विविध प्रकारचे भेद अजूनही दिसून येतात. अशा वेळी तुकडोजी महाराजांचा समतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच आहे, ही भावना समाजात रुजली तर अनेक संघर्षांना आळा बसू शकतो.

**स्वातंत्र्यलढ्यातील योगदान**

तुकडोजी महाराजांच्या कार्याला राष्ट्रभक्तीचीही भक्कम किनार होती. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला आणि त्यांना कारावासही भोगावा लागला. त्यांच्या भजनातून स्वातंत्र्याची प्रेरणा आणि राष्ट्रजागृती निर्माण झाली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांचे राष्ट्रकार्य थांबले नाही. समाजातील दुर्बल घटकांचे उत्थान, ग्रामविकास, अस्पृश्यता निर्मूलन, जातिभेद निर्मूलन आणि राष्ट्रीय एकात्मता यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले. त्यांच्यासाठी राष्ट्रभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हती; समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास आणि सन्मान पोहोचविणे हीच खरी राष्ट्रसेवा होती.

**आजच्या पिढीसाठी संदेश**

आजची पिढी तंत्रज्ञानाच्या वेगवान जगात जगत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे जग जवळ आले आहे. मात्र माणसामाणसातील संवाद कमी होण्याची चिंता निर्माण झाली आहे. अशा काळात तुकडोजी महाराजांचा विचार आपल्याला समाजाशी जोडतो.

त्यांनी तरुणांना व्यसनांपासून दूर राहण्याचा, शरीर आणि मन सुदृढ ठेवण्याचा, शिक्षण घेण्याचा आणि राष्ट्रनिर्माणात योगदान देण्याचा संदेश दिला. महिलांच्या सन्मानालाही त्यांनी महत्त्व दिले. समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीचा विचार त्यांच्या कार्यात दिसतो. मोझरी येथील गुरुकुंज आश्रमाची स्थापना आणि ग्रामगीतेची निर्मिती ही त्यांच्या कार्यातील दोन महत्त्वाची पर्वे मानली जातात. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे कार्य आजही गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून सुरू आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे महत्त्व केवळ त्यांच्या जयंती किंवा पुण्यतिथीपुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यापेक्षा त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात स्थान देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. गाव स्वच्छ ठेवणे, अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे, जातिभेदाला नकार देणे, श्रमाचा सन्मान करणे, समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणे हीच त्यांच्या विचारांची खरी अंमलबजावणी आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# लेखन आणि कुटुंबीय हेच माझ्या म्हातारपणाचे टॉनिक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## ज्येष्ठ विनोदी कथालेखक डॉ.दशरथ भोसले यांच्या दोन कथासंग्रहांचे प्रकाशन



**पुणे** – 'लेखन आणि कुटुंबीय हेच माझ्या म्हातारपणाचे टॉनिक आहे,' असे भावपूर्ण उद्गार ज्येष्ठ विनोदी कथालेखक डॉ.दशरथ भोसले यांनी काढले. वयाच्या ७९व्या वर्षी त्यांच्या 'काकांना अटॅक येतो..!' आणि 'म्हातारपणाचं टॉनिक' या दोन विनोदी कथासंग्रहांचे प्रकाशन पुण्यातील वीर बाजी पासलकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक म्हणून डॉ.भोसले यांचा माजी कुलगुरु, नागपूर विद्यापीठाचे डॉ.एस.एन.पठाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ.दशरथ भोसले हे एम.ए., पीएच.डी. असून कोकण कृषी विद्यापीठात सहाय्यक कुलसचिव म्हणून सेवा बजावून निवृत्त झाले आहेत. 'रथ मांगल्याचा' हे त्यांचे यापूर्वी प्रकाशित झालेले पुस्तक असून, नव्या दोन कथासंग्रहांमुळे त्यांच्या साहित्यिक प्रवासात आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना डॉ.एस.एन.पठाण यांनी आजची पिढी आई-वडील, नातेवाईक आणि संस्कृतीपासून दूर जात असल्याची खंत व्यक्त केली. सांस्कृतिक वारसा जपण्याची गरज असल्याचे सांगताना त्यांनी डॉ.भोसले यांच्या दोन्ही कथासंग्रहांचे कौतुक केले. त्यांच्या लेखनातून समाजातील विविध वैगुण्यांवर विनोदी शैलीत भाष्य करण्यात आले असून, हे विनोद केवळ हसविणारे नसून वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले. कोकणातील संस्कृती, सण-उत्सव, माणसे आणि परस्परांतील जिव्हाळाही त्यांच्या लेखनातून प्रभावीपणे समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुण्या तथा नेटल्स प्रकाशन, दिल्लीच्या मालक व प्रकाशक कुमारी अनुरंजिता पाठक यांनी नवोदित लेखकांना संधी देण्याच्या उद्देशाने प्रकाशन संस्था सुरू करण्यात आल्याचे सांगितले. डॉ.भोसले यांच्या पुस्तकांचे संपादन करताना त्यांच्या विषयांची निवड आणि लेखनातील वेगळेपणा सातत्याने जाणवल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.भारत द.कऱ्हाड यांनी या दोन्ही पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रवास उलगडताना सांगितले की, विविध सभा व कार्यक्रमांमध्ये डॉ.भोसले यांच्या बोलण्यातून त्यांची विनोदी शैली प्रकर्षाने जाणवत होती. त्यामुळे 'आपण लिहीत का नाही?' असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर डॉ.भोसले यांनी 'मी लिहीन, तुम्ही मला मदत करा,' असे उत्तर दिले.

त्यानंतर सलग ५२ आठवडे दर रविवारी एक विनोदी कथा लिहून घेण्यात आली. या लेखनातूनच पुढे या दोन कथासंग्रहांची निर्मिती झाली. या उपक्रमासाठी परळी येथील संपादक मोहन व्हावळे यांच्या 'संघर्ष नेता' या वृत्तपत्राचे सहकार्य लाभल्याचे डॉ.कऱ्हाड यांनी सांगितले.

आपल्या मनोगतात डॉ.दशरथ भोसले यांनी प्राचार्य डॉ.भारत द.कऱ्हाड हे या पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. पत्नी, सून, मुलगा, मुलगी आणि नातू यांच्या प्रेरणेमुळे लेखन सुरू ठेवता आल्याचे त्यांनी नमूद केले. दर आठवड्याला लिहिलेली कथा ते कुटुंबीयांना वाचून दाखवत असत. कुटुंबीयांच्या सूचना आणि प्रतिक्रियांमुळे लेखन अधिक समृद्ध होत गेले. तसेच कोकण कृषी विद्यापीठातील सहकाऱ्यांनी दर रविवारी प्रसिद्ध होणाऱ्या लेखांना मनापासून दाद दिल्याने लेखनाची प्रेरणा कायम राहिली.

'लेखन आणि कुटुंबीय हेच माझ्या म्हातारपणाचे टॉनिक आहे,' या त्यांच्या भावपूर्ण विधानाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी ॲड.वैशाली नितीन भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोही प्रशांत शिंदे आणि अदा युवराज शिंदे यांनी गणेशवंदना सादर केली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लेखकाच्या कुटुंबातील तीन पिढ्या एकत्रितपणे उपस्थित होत्या.

# डास उत्पत्तीस्थानी गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम

## हिवताप, हत्तीरोग, डेंग्यू व चिकनगुनिया नियंत्रणासाठी उपजिल्हा रुग्णालयाचा उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – हिवताप, हत्तीरोग, डेंग्यू व चिकनगुनिया या किटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय मोर्शीच्या हिवताप व हत्तीरोग विभागातर्फे डासांच्या उत्पत्तीस्थानी गप्पी मासे सोडण्याची मोहीम राबविण्यात आली. साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडून डासांच्या अळ्यांचे जैविक पद्धतीने नियंत्रण करण्यात आले.

यावेळी नागरिकांना परिसरात पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे व डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करण्याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. ही मोहीम वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.निकोसे व हत्तीरोग अधिकारी डॉ.जुनेद यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य निरीक्षक विनय शेलुरे यांच्यासह प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे, संघपाल कांबळे, नितीन बरडे, नंदू थोरात, अक्षय शेवाळे, ऋषिकेश दहेकर व विनोद डहाके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दुष्काळावर उपायांसाठी उच्चस्तरीय अभ्यासगट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर तातडीच्या उपाययोजनां बरोबरच दीर्घकालीन उपाययोजनांची आखणी करण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय अभ्यासगट नेमला आहे.

महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हा अभ्यासगट राज्यात यापूर्वी तसेच अन्य राज्यांमध्ये राबविण्यात आलेल्या प्रभावी उपाययोजनांचा अभ्यास करून दुष्काळावर मात करण्याबाबत सरकारला शिफारसी करणार आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना सूचविण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या उपसमितीच्या २९ सप्टेंबर रोजीच्या बैठकीत विविध उपाययोजनांद्वारे दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे २५ रुग्णांवर यशस्वी सामान्य शस्त्रक्रिया

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपजिल्हा रुग्णालय येथे आयोजित सामान्य शस्त्रक्रिया शिबिरात तब्बल २५ रुग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना त्यांच्या जवळच्याच शासकीय रुग्णालयात गुणवत्तापूर्ण व मोफत उपचार मिळावेत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात हर्निया, हायड्रोसिल, अम्बिलिकल हर्निया, अपेंडिक्स यासह विविध सामान्य आजारांवरील आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करून पात्र रुग्णांची निवड करण्यात आली. त्यानंतर तज्ज्ञ वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध पद्धतीने सर्व शस्त्रक्रिया पार पडल्या.

शस्त्रक्रियेनंतर सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर व समाधानकारक असल्याची माहिती देण्यात आली. रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाची काळजी, आहार, औषधोपचार तसेच आवश्यक वैद्यकीय सूचनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णांच्या प्रकृतीवर नियमित देखरेख ठेवण्यात येत असून, प्रकृती स्थिर झाल्यानंतरच त्यांना आवश्यक औषधोपचार व सूचनांसह डिस्चार्ज देण्यात येणार आहे.

या शिबिरात सर्जन डॉ.प्रविण बिजवे, डॉ.राहुल खन्ना तसेच भूलतज्ज्ञ डॉ.जगदीश काळभोर यांनी महत्त्वाची वैद्यकीय भूमिका बजावली. त्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनामुळे शस्त्रक्रिया सुरक्षितपणे व यशस्वीरीत्या पार पडल्या.

सदर शस्त्रक्रिया शिबिर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद निरवणे तसेच निवासी बाह्य संपर्क अधिकारी डॉ.संदीप हेडाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय मोर्शीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांनी शिबिराचे नियोजन, व्यवस्थापन व समन्वयासाठी विशेष प्रयत्न केले.

तसेच मोर्शी व वरुड येथील वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर व डॉ.प्रेरणा वानखेडे यांचेही शिबिरासाठी सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी वर्षा दारोकर, संदीप पवार, प्रतीक्षा पांचाळे, रेशमा बहुरुपी, मीनाक्षी मेश्राम, विशाखा ब्राह्मणे, दीपिका गोटे, सागर झटाले, नौशाद खान, हबीब खान, ज्ञानेश्वर टाकळे, प्रवीण कापडे, शोभा इंगळे, संगिता तायवाडे तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत जन आरोग्य योजना विभागातील वशीम शेख व प्रकाश पांडे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना मोठ्या शहरातील रुग्णालयात न जाता शासकीय आरोग्य योजनांच्या माध्यमातून त्यांच्या जवळच मोफत व दर्जेदार शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले. या उपक्रमामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून, उपजिल्हा रुग्णालय मोर्शीच्या आरोग्यसेवेतील या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१८/२०२६ ने.ता.२१/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) मंजुळा सुधाकर कळंबे, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) राजु सुधाकर कळंबे, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, ३) सुनिता शंकरराव वाठ, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, ४) अनिता श्रावण बालपांडे, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम, ५) कविता सुभाष सांबारे, वय अं.३९ वर्ष, धंदा-घरकाम, ६) सविता मोहन खुरसंगे, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.४ व ६ रा.पांढुर्णा, अर्जदार क्र.५ रा.मारुड, ता.जि.पांढुर्णा

... विरुध्द ...

**कोणी नाही :-** गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत सुधाकर गणपत कळंबे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०५/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९२/२०२६ ने.ता.०६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) सिमा विनोद डोंगरे, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम

२) सक्षम विनोद डोंगरे, वय अं.१९ वर्ष, धंदा-शिक्षण

अर्जदार क्र.१ ते ३ रा.संजय गांधी नगर, नागपूर,४४००१७

... विरुध्द ...

**कोणी नाही :-** गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत विनोद मधुकर डोंगरे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०५/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९५/२०२६ ने.ता.०६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) भागिरथी प्रकाश नेहारे, वय अं.५३ वर्ष, धंदा-घरकाम

२) मंगेश प्रकाशराव नेहारे, वय अं.३१ वर्ष, धंदा-शेती

३) वर्षा प्रकाश नेहारे, वय अं.३१ वर्ष, धंदा-घरकाम

४) जनाबाई शंकर नेहारे, वय अं.७९ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ ते ४ रा.बहादा, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

**कोणी नाही :-** गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत प्रकाश शंकर नेहारे, रा.बहादा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०५/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८४७/२०२६ ने.ता.०४/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) रोहीणी उमेशराव गुरवे, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम

२) आदित्य उमेशराव गुरवे, वय अं.२२ वर्ष, धंदा-शिक्षण

३) अश्विनी उमेशराव गुरवे, वय अं.२० वर्ष, धंदा-शिक्षण

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, वॉल्मीकी कॉलोनी, ता.वरुड

... विरुध्द ...

**कोणी नाही :-** गैरअर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत उमेश जवरीलाल गुरवे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०३/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# पक्षांतर करणाऱ्यांना चिन्ह देता येईल का? शिवसेना पक्ष, चिन्ह सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – पक्षांतराचे 'घटनात्मक पाप' केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तींना पक्षाचे निवडणूक चिन्ह देता येईल का? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उपस्थित केला. शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने विधानसभा सदस्यांच्या संख्याबळाच्या आधारे एकनाथ शिंदे गटाला धनुष्यबाण हे पक्षचिन्ह देण्याचा घेतलेला निर्णय योग्य होता का, यावर सुनावणीदरम्यान न्यायालयाने ही मौखिक टिप्पणी केली. या प्रकरणाची सुनावणी सलग दोन दिवस सुरू राहणार आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर शिवसेनेतील फुटीशी संबंधित विविध याचिकांवर सुनावणी सुरू आहे. शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. ...तर पक्षचिन्हाचा प्रश्न कसा हाताळणार? कौल यांनी विविध सर्वोच्च न्यायालयीन निवाड्यांचा दाखला देत विधिमंडळातील बहुमताचा निकष योग्य असल्याचे समर्थन केले. निवडणूक चिन्ह आदेशानुसार कोणता गट हाच मूळ राजकीय पक्ष आहे, हे ठरवताना हा निकष कायदेशीरदृष्ट्या वैध आणि संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२०/२०२६ ने.ता.०४/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) पुष्पा वासुदेव बेलसरे, वय अं.६५ वर्ष, धंदा–शेती

२) निरज वासुदेव बेलसरे, वय अं.४४ वर्ष, धंदा–घरकाम

अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत सदाशिव रोडबाजी बेलसरे व सोनाबाई, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५०/२०२६ ने.ता.०६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) उषा रमेश इंगळे, वय अं.६४ वर्ष, धंदा–घरकाम

२) प्रदीप रमेश इंगळे, वय अं.४६ वर्ष, धंदा–शेती

३) नितिन रमेशराव इंगळे, वय अं.४२ वर्ष, धंदा–शेती

४) कांचन सतीशराव धामणकर, वय अं.४५ वर्ष, धंदा–घरकाम

अर्जदार क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत रमेश हरिभाऊ इंगळे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१७/२०२६ ने.ता.०४/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) राहुल विजय तरार, वय अं.४६ वर्ष, धंदा–शेती

२) शितल विजय तरार, वय अं.५३ वर्ष, धंदा–घरकाम

अर्जदार क्र.१ रा.पुणे, अरिहंत कॉलेज जवळ, पुणे

अर्जदार क्र.२ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत विजय लक्ष्मणराव तरार व आशा विजय तरार, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८९/२०२६ ने.ता.०४/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) भागवतराव गुलाबरा बेलखडे, वय अं.५९ वर्ष, धंदा–शेती

२) शुभम भागवतराव बेलखडे, वय अं.२८ वर्ष, धंदा–शेती

दोन्ही रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती,

३) सौ.शितल तिर्थराज ढगे, वय अं.३० वर्ष, धंदा–गृहिणी

रा.चौरे लेआऊट, वाडी नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गिता भागवतराव बेलखडे, रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# विरोधक म्हणत असलेला तुझ्या तोंडात असणारा सोन्याचा चमचा शोधतोय, पाठीराख्या बापाचं रोहित पवारांसाठी भावनिक पत्र

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**पुणे** – गेल्या सहा दिवसांपासून पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसोबत आंदोलनाला बसलेल्या रोहित पवार यांची सध्या राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा सुरु आहे. पुण्यात सध्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या तीन वेगवेगळ्या गटांकडून आंदोलनं सुरु असली तरी रोहित पवार यांचे आंदोलन सर्वाधिक लक्ष वेधून घेणारे ठरत आहे. रोहित पवार गेल्या सहा दिवसांपासून एस.एम. जोशी पुलाजवळच रात्री विद्यार्थ्यांसोबत दिवस–रात्र ठिय्या मांडून आहेत. ते रोज रात्री येथेच झोपत आहेत. त्यांच्या या आंदोलनाला विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी भेट दिली आहे. त्यामुळे पुण्यातील हे आंदोलन सध्या प्रचंड गाजत आहे. मात्र, सत्ताधारी पक्षाचे नेते रोहित पवारांच्या या आंदोलनाला नौटंकी म्हणून हिणवत आहेत. तसेच पवार घराण्यातून असल्यामुळे रोहित पवार म्हणजे तोंडात सोन्याचा चमचा असणारा नेता असल्याचा उल्लेखही सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून वारंवार केला जात आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांचे वडील राजेंद्र पवार यांनी एक जाहीर पत्र लिहून आपल्या भावना मांडल्या आहेत. राजेंद्र पवार यांचे हे भावनिक पत्र सध्या सोशल मिडीयावर तुफान व्हायरल होत आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी), (कनिष्ठ.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९०/२०२६ ने.ता.२१/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती लता संजयराव बारमासे, वय अं.५४ वर्ष, धंदा–गृहिणी, २) रक्षीत संजयराव बारमासे, वय अं.२२ वर्ष, धंदा–शिक्षण, ३) नम्रता संजयराव बारमासे, वय अं.२५ वर्ष, धंदा–खाजगी नोकरी, क्र.१ ते ३ रा.बेनोडा (श), ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत संजय मारोतराव बारमासे, रा.बेनोडा (श), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८६/२०२६ ने.ता.०४/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती लक्ष्मीबाई गुलाबराव तायवाडे, वय अं.७५ वर्ष, धंदा–गृहिणी, २) केशव गुलाबराव तायवाडे, वय अं.५२ वर्ष, धंदा–मजुरी, ३) छत्रपती गुलाबराव तायवाडे, वय अं.४७ वर्ष, धंदा–मजुरी, क्र.१ ते ३ रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, ४) श्रीमती सिंधुबाई संतोषराव कसारे, वय अं.५५ वर्ष, धंदा–गृहिणी, रा.पट्टन, ता.पट्टन, जि.बैतुल, ५) सौ.रजनी राजु वानखडे, वय अं.५० वर्ष, धंदा–गृहिणी, रा.हिरदागड, ता.जुन्नारदेव, जि.छिंदवाडा, ६) सौ.संगिता बलदेवराव हिवराळे, वय अं.४१ वर्ष, धंदा–गृहिणी, रा.गवना, ता.पट्टन

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गुलाबराव बालाजी तायवाडे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी), (कनिष्ठ.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८८/२०२६ ने.ता.०७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती विमल मनोहर कुकडे, वय अं.६३ वर्ष, धंदा–गृहिणी, २) कु.स्मिता मनोहर कुकडे, वय अं.४१ वर्ष, धंदा–गृहिणी, ३) सौ.कोमल प्रविण वासनिक, वय अं.४२ वर्ष, धंदा–गृहिणी, ४) सौ.मोनिका पवन कांबळे, वय अं.३५ वर्ष, धंदा–गृहिणी, ५) वृषभ मनोहर कुकडे, वय अं.३१ वर्ष, धंदा–नोकरी, क्र.१ ते ५ रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.क्रं.१ ते ५ रा.एन.आय.टी.गार्डनजवळ, नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मनोहर जंगलु कुकडे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी), (कनिष्ठ.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२४/२०२६ ने.ता.२१/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती माला साहेबराव दंडारे, वय अं.६५ वर्ष, धंदा–घरकाम, २) रविंद्र साहेबराव दंडारे, वय अं.४२ वर्ष, धंदा–शेती, क्र.१ व २ रा.बारगांव, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सौ.संगिता ओमप्रकाश भालसागर, वय अं.४४ वर्ष, धंदा–घरकाम, रा.जलालखेडा, ता.काटोल, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत साहेबराव विठोबाजी दंडारे, रा.बारगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




## दारुच्या नशेत ४५ वर्षीय पित्याकडून पोटच्या लेकीवर अतिप्रसंगाचा प्रयत्न? संतापात १७ वर्षीय मुलीने डोक्यात बॅट टाकली, पित्याचा जागीच मृत्यू

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**नागपूर** – नागपूरमधील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दारूच्या नशेत असलेल्या ४५ वर्षीय पित्याने आपल्या १७ वर्षीय मुलीसोबत शिवीगाळ करत बळजबरी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. बापाच्या कृत्याचा विरोध करताना झालेल्या वादात मुलीने लाकडी बॅटने डोक्यावर प्रहार केल्याने पित्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर सर्वत्र मोठी खळबळ उडाली असून या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत जयपाल बारेलाल खोलपिटणे याला दारूचे व्यसन होते. घटनेच्या रात्री तो दारू पिऊन घरी आला आणि १२वीत शिकणाऱ्या मुलीसोबत असभ्य वर्तन करू लागला. वाद वाढल्यानंतर त्याने मुलीला मारहाणही केली. परिणामी, स्वतःचा बचाव करताना संतप्त मुलीने घरात असलेल्या लाकडी बॅटने पित्याच्या डोक्यावर गंभीर वार केला. या हल्ल्यात जयपाल यांचा मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेची माहिती नियंत्रण कक्षाला ११२ नंबरवर मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी एम्स रुग्णालयात पाठवण्यात आला असून पोलिसांनी अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले आहे.

## गृहकर्जधारकांना मोठा झटका, ४ वर्षात जे घडलं नाही ते झालं, रिझर्व्ह बँकेने रेपो रेट वाढवला

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेली अस्थिरता, वाढती महागाई, भांडवली बाजारातील मोठी पडझड या सगळ्या पार्श्वभूमीवर अखेर भारतीय रिझर्व्ह बँकेने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी रेपो रेटमध्ये वाढ करत असल्याची घोषणा केली. रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची वाढ केली आहे. त्यामुळे रेपो रेट ५.२५ टक्क्यांवरुन ५.५० टक्के इतका झाला आहे. याचा परिणाम आता कर्जदारांवर होणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयानंतर बँकाकडून लवकरच गृहकर्ज , वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचा व्याजदरात मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे गृहकर्ज घेतलेल्या सामान्य नागरिकांचा मासिक हप्ता म्हणजे ईएमआय वाढण्याची शक्यता आहे. गेल्या चार वर्षांमध्ये रिझर्व्ह बँकेने पहिल्यांदाच रेपो रेटमध्ये वाढ केली आहे.

## गांधींवरील पोलिसांच्या कारवाई विरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या संतापाचा उद्रेक : नागपुरात मध्यरात्री भाजप कार्यालयासमोर युवक काँग्रेसचं आंदोलन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**नागपुर** – निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता आणि मतदार याद्यांमधील त्रुटींचा आरोप करत, काल (६ ऑक्टोबर) 'इंडिया' आघाडीचे खासदार आणि नेते निवडणूक आयोगाला घेराव घालण्यासाठी दिल्लीच्या रस्त्यांवर उतरले. या आंदोलनादरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि विरोधी पक्षातील नेत्यांना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आल्यानंतर राजकीय वतुर्ळातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अशातच राहुल गांधी यांच्यावर दिल्ली पोलिसांच्या कारवाईच्या विरोधात नागपुरात युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मध्य रात्री १२.३० वाजताच्या सुमारास गणेशपेठ परिसरातील भाजप कार्यालय समोर जोरदार घोषणाबाजी केल्याचं समोर आलं आहे.

तर दुसरीकडे युवक काँग्रेसचे कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालय समोर आंदोलन केल्याचे कळताच भारतीय जनता युवा मोर्चाचा कार्यकर्त्यांनी ही प्रत्युत्तर देण्यासाठी गणेश पेठ पोलीस स्टेशन समोर जाऊन काँग्रेस विरोधात आंदोलन केलंय. त्यामुळे नागपुरात भाजप विरुद्ध काँग्रेस असा वाद पेटला असून यावरून आता राजकारण तापलं आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |

## दुष्काळ पाहणीसाठी येणार केंद्राचे पथक : पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य – फडणवीस

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक लवकरच राज्याच्या दौऱ्यावर येणार आहे. या पाहणीनंतर राज्यातील परिस्थितीचा 'ग्राऊंड रिपोर्ट' केंद्र सरकारला सादर करण्यात येईल. विविध पिकांच्या नुकसानीचे पंचनामे आणि सर्वेक्षण सुमारे २३ हजार गावांमध्ये पूर्ण झाले असून, उर्वरित गावांतील सर्वेक्षणही वेगाने सुरू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

केंद्राकडून अपेक्षित मदत मिळविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया विक्रमी वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न राज्य सरकारकडून सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यात दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना सरकारने पाण्याच्या वापराचा प्राधान्यक्रम ठरवला आहे. पुढील वर्षाच्या ऑगस्टपर्यंत दुष्काळग्रस्त भागातील पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठीचा पाणीसाठा राखीव ठेवला जाणार आहे.दुष्काळग्रस्त भागातील पाणीवाटपाचे नियोजन करताना कोणताही अपवाद आवश्यक असल्यास संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमितीकडे पाठवावा. प्रस्ताव योग्य असल्यास त्यावर निर्णय घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**गोकुळची निवडणूक महायुती एकत्र लढणार**

कोल्हापूरच्या गोकुळ दूध महासंघाची निवडणूक महायुती एकत्रित लढणार असून मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे निवडणुकीचे नेतृत्व सोपविण्यात आल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. महायुतीतील मंत्री चंद्रकांत पाटील, प्रकाश आबिटकर, धनंजय महाडिक, राजेश क्षीरसागर यांच्यासह अन्य नेते या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. ही निवडणूक स्थानिक तसेच सहकार क्षेत्राशी संबंधित असल्याने आपण त्यात थेट हस्तक्षेप करणार नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**ग्रामीण भागात सुरळीत वीजपुरवठ्यासाठी निधी**

दुष्काळी परिस्थितीमध्ये सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) मधून प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या निर्णय घेतला आहे. वीजे अभावी शेतकऱ्यांची पिके वाया जावू नयेत यासाठी वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी डीपीडीसीतून प्रत्येक जिल्ह्यासाठी २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावाला फडणवीस यांनी मान्यता दिली.







